| | |
|---|---|
| MHNG030074982026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२८८/२०२६**<br>**संतोष डेरहा साबरसाठी वि.महाराष्ट्र शासन** |

<u>**निशाणी १ वरील आदेश**</u>

अर्जदार यांनी कळमना पोलिस स्टेशन, नागपूर येथे गु.र.क्र.२८२/२०२६ मध्ये कलम ३०५(अ) व ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३ प्रमाणे नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त केलेल्या अंदाजे ४.५ ग्राम वजनाच्या दोन सोन्याच्या मंगळसूत्रातील पदकांचा अंतरीम ताबा मिळण्याकरीता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ५०३ नुसार अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार वर नमुद गुन्ह्याच्या तपासाकामी पोलीसांनी चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे. अर्जात नमूद मुद्देमाल हा त्यांच्या मालकीचा आहे. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात नमूद मुद्देमाल परत मिळाल्यास न्यायालयाने नमूद केलेल्या अटी शर्तीचे अर्जदार पालन करण्यास तयार आहे असे नमूद केले असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. संबंधित तपासी अधिकारी यांनी निशाणी ०४ प्रमाणे खुलासा दाखल केला आहे की, त्यांनी सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान ८.८३ ग्राम वजनाचे दोन सोन्याचे/पिवळ्या धातुचे पदक जप्त केले असून फिर्यादीने सदर मुद्देमाल ओळखलेला आहे. त्यामुळे योग्य आदेश करण्याची विनंती केली आहे. विद्वान सरकारी वकील यांनी खुलासा दाखल केला आहे की, योग्य आदेश करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदार यांनी त्यांचे कथनाच्या पुष्टीकरीता निशाणी ०३ सोबत आधार कार्ड व दागीन्यांच्या बिलाची पडताळणी केलेली प्रत तसेच एफआयआर ची प्रत दाखल केली आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीकरीता वर नमुद गुन्ह्यातील आरोपींना नोटिस देऊनही त्यांनी सदर प्रकरणात हरकत घेतलेली नाही. तसेच फिर्यादी व्यतिरिक्त आजपर्यंत जप्त मुद्देमालाची कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणातील जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र आहे असे प्रथम दर्शनी दिसुन येते.

५. अर्जात नमूद जप्त मुद्देमाल/वस्तु पोलिस स्टेशनला जास्त दिवस पडुन राहील्यास ते निश्चित खराब होण्याची शक्यता आहे व तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल हे देखील स्पष्ट आहे. ***सुदरभाई अंबालाल देसाई वि. गुजराथ राज्य ए.आय.आर. २००३ मा.सर्वोच्च न्यायालय ६३८*** या न्यायनिर्णयातील मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार अशा जप्त मुददेमालासंबंधी

त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर मुद्देमाल योग्य त्या अटी-शर्तीवर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. संबंधित तपासी अधिकारी यांनी सदर मुद्देमालाचा ताबा योग्य त्या अटी शर्ती वर अर्जदारास देण्याबाबत कोणतीही हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. अर्जात दाखल दस्तऐवजांवरुन व खुलाशाचे अवलोकन करता अर्जदार हे अर्जात नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र ठरतात. सबब खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद गु.र.क्र.२८२/२०२६ मध्ये कलम ३०५(अ) व ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३ प्रमाणे नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त केलेल्या ८.८३ ग्राम वजनाच्या दोन सोन्याच्या मंगळसूत्रातील पदकांचा अंतरीम ताबा रक्कम रुपये १,३०,०००/- (रुपये एक लाख तिस हजार मात्र) चे सुपूर्तनामा सादर केल्यानंतर खालील अटी व शर्तीवर अर्जदार **संतोष डेरहा साबरसाठी** यांना देण्यात यावा.

अ. अर्जात नमूद वस्तू आहे त्या स्थितीत ठेवण्यात यावे. त्याचे रंगात, आकारात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येवु नये व इतर कोणालाही हंस्तातरण किंवा विक्री करण्यात येवु नये.

ब. न्यायालय आदेश करले त्यावेळी सदर वस्तु आदेशित स्थळी हजर करावे.

क. अर्जदार यांनी वस्तूसबंधी मुळ दस्त ताबा घेतेवेळेस तपासी अधिकारी यांचे अवलोकनाकरीता हजर करावे. तपासी अधिकारी यांनी मूळ दस्तऐवजांचे अवलोकन केल्यानंतरच वर नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा अर्जदारास दयावा.

ड. अर्जात नमुद मुद्देमालाच्या **धातुच्या शुध्दतेबाबत अधिकृत व्यक्तीमार्फत शुध्दता तपासल्यानंतरच** त्यांचा अंतरीम ताबा अर्जदारास दयावा.

३. अर्जदार यांना जप्त मुद्देमालाचा/वस्तू चा ताबा देण्यापुर्वी संबंधित तपासी अधिकारी यांनी अर्जदाराच्या खर्चाने जप्त मुद्देमालाचा साक्षीदारांसमक्ष नियमानुसार पंचनामा तयार करुन, त्याचे रंगीत छायाचित्रे काढुन दोषारोप पत्रासह न्यायालयात दाखल करावे.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.03.30 11:47:37 +0530

दिनांकः २७-०३-२०२६.

(निलेश भा. पाटील)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.३, नागपूर.

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this P.D.F. File of order are same word to word as per original order.

Name of Stenographer : Smt.V.N.Meshram